## L. A. BILL No. IX OF 2024.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९.**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १ मार्च, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक १ मार्च, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९४९ चा महा. ५९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

१९४९ चा महा. ५९.

**२.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (३) मधील, पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईलः—

२०२४ चा महा. .

"परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२४ याच्या प्रारंभानंतर, महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, प्रत्येक प्रभागातून, शक्य असेल तेथवर, चार पालिका सदस्य, परंतु तीनपेक्षा कमी नाहीत व पाचपेक्षा अधिक नाहीत एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील, आणि या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक मतदाराला, त्याच्या प्रभागातील निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येइतकी मते देण्याचा हक्क असेल :".

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९. ]**

**[ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
मुख्यमंत्री.]

[ **विधानसभेने दिनांक १ मार्च, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.**]

[ **विधानपरिषदेने दिनांक १ मार्च, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.**]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई